FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

पहिली खबर

0167733

# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station भ्रा.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. 06, वर्ष Year 2020 दिनांक Date 23/07/20

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections कलम ७
(ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : वार सोमवार तारीख पासून 20/07/20 वेळ 15:00 तारीख पर्यंत 23/07/20 वेळ ........
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 20/07/2020 वेळ Time 14:00 वा.
(c) गुन्हा दाखल झालेल्या सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 04/2020 तारीख Date 23/07/2020 वेळ Time 06.45 वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ........, चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ........
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव मिळकत व्यवस्थापक म्हाडा कार्यालय कुर्ला/चेंबूर १ला मजला ठिकाणाचे नंबर ........, गल्ली ........, रस्त्याचे नाव कलानगर
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ........, गाव ........, पोस्ट ........, तालुका ........, जिल्हा........, राज्य ........
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ........, तालुका ........, जिल्हा........, राज्य ........
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / ✓ देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name श्री रामदास खाडे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name सुदाम खाडे
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ३७ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9167183591
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation इस्टेट एजेन्ट
(g) धर्म Religion हिंदू, जात Caste वंजारी, जनजात Sub-Caste ........
(h) पत्ता Address : आनंदी सदन, वार्ड / गल्ली / सर्व्हे नं. Ward 31/301, घर नं. / नाव House/Name No. कविल पंचरत्न म्हाडा कॉलनी, फोन / मो. नं. Phone/Mo. No. 9167183591, पॅन नं. PAN No. BFTPK5968Y, कार्ड नं. Card No. ........
रस्त्याचे नाव Road महाराष्ट्र नगर, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place मानखुर्द (पू) मुंबई, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........
तालुका Taluka पाटोदा, जिल्हा Dist. बिड, राज्य State महाराष्ट्र, मुक्काम पत्ता Present Address मुळ सावरगाव घाट महाराष्ट्र 413207

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
आलोसे क्र.१-श्रीमती कविता हिरासिंग राठोड वय ५७ वर्षे धंदा नोकरी मिळकत व्यवस्थापक कुर्ला/चेंबूर म्हाडा, बांद्रा पूर्व मुंबई रा.ठी. रुम/८ बी/ व्हींग ३०६, प्रतिक्षा नगर, सायन मुंबई मो.क्र. 9967173659
आलोसे क्र.२-श्री. नरेश रामचंद्र आवडे, वय ४७ वर्षे धंदा नोकरी सहाय्यक कुर्ला/चेंबूर म्हाडा बांद्रा पूर्व मुंबई रा.ठी. रुम/२/सी/५०४, कृपा सिंधू सहकार नगर, म्हाडा कॉलनी, कामगार नगर, रोड टिळक नगर, चेंबूर मुंबई २४. मो.नं. 9821995727
8689892299

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with CamScanner

यातील फिर्यादी श्री रामदास सुदाम खाडे, वय ३७ वर्षे यांचा
स्वतंत्र पानावर संगणकावर टंकलिखित केलेला जबाब हाच
प्रथम खबरी अहवाल म्हणुन संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(नवनाथ जगताप)
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

Scanned with CamScanner

दिनांक— २३/०१/२०२०

—फिर्याद—

श्री. रामदास सुदाम खाडे, वय—३७ वर्षे, धंदा— रियल इस्टेट एंजेन्ट, रा.ठि. ३/सी/३०१ आनंदी सदन को. ऑ. हौ. सोसायटी, पंचरत्न म्हाडा संकुल, महाराष्ट्र नगर, मानखुर्द मुंबई— ४०० ०८८. मो.क्र. ९१६७१८३५९१

———००———

मी वरील प्रमाणे असून, नमुद पत्यावर गेल्या ०७ वर्षापासून माझी पत्नी सौ. वनीता रामदास खाडे, वय ३२ वर्षे, मुलगी कुमारी ज्ञानेश्वरी रामदास खाडे वय १५ वर्षे, मुलगा कुमार शुभम रामदास खाडे, वय १२ वर्षे, यांच्यासह राहतो.

माझा रियल इस्टेट कन्सलटंन्सीचा व्यवसाय असुन त्याचे कार्यालय सिध्दीविनायक हौसींग सोसायटी, बि.नं. २/डी, गाळा नं. ४, मानखुर्द मुंबई येथे आहे. माझी पत्नी सौ. वनीता रामदास खाडे, हिच्या नावे व्यवसायाचा परवाना असून आम्ही भगवान कृपा रियल इस्टेट कन्सलटंन्सी या नावाने व्यवसाय करतो. सदर कामातुन मिळणारे उत्पन्नावर माझा व माझ्या कुटूंबियाचा उदरनिर्वाह चालतो.

दिनांक २०/१२/२०१९ रोजी श्रीमती सुवर्णा बंडू वळकुंडे, रा.ठी. इमारत क्रं. ३/अ निवासीगाळा क्रमांक ५०१, ओम सहकारी गुहनिर्माण संस्था मर्यादित, पंचरत्न म्हाडा संकुल, तुर्भे मंडाले, मानखुर्द, पूर्व मुंबई यांनी ते राहात असलेल्या इमारती मधील निवासीगाळा क्रमांक २१० हा सौ सुजाता सर्जेराव आढाव यांचेकडून खरेदी घ्यावयावचा असून सदरचा गाळा त्याचे नावे करावयाचा असल्याबाबत सांगून, फ्लॅटचे रजिस्ट्रेशन व म्हाडा ट्रान्सफरचे काम आमच्या एंजन्सीला दिले होते.

श्रीमती सुवर्णा बंडू वळकुंडे यांच्या विनंती प्रमाणे मी उपनिबंधक क्र. २, चेंबूर मुंबई येथून खरेदीखत रजिस्ट्रेशन करुन घेतले आहे. त्यांनतर सदर गाळयाचे नावामध्ये फेरफार (नियमीतीकरण) करण्याकरीता विक्रीकरणार व खरेदीदार यांच्या सहमतीने नाव ट्रान्सफर करीता दि.२०/१२/२०१९ रोजी ऑनलाईन म्हाडा मुंबई यांचेकडे प्रपोजल सादर केले होते. त्यांनतर मी सदर विभागाचे मिळकत व्यवस्थापकीय कुर्ला/चेंबूर चे मिळकत व्यवस्थापक श्रीमती कविता राठोड, व त्यांचे सहाय्यक श्री नरेश गावडे याच्याकडे आलो. मिळकत व्यवस्थापक श्रीमती कविता राठोड, व त्यांचे सहाय्यक श्री नरेश गावडे यांना भेटून माझे वरील प्रपोजल संदर्भात चर्चा केली. चर्चे दरम्यान मिळकत व्यवस्थापक श्रीमती कविता राठोड, व त्यांचे सहाय्यक श्री नरेश गावडे यांनी नावामध्ये फेरफार (नियमीतीकरण) करण्याकरीता माझ्याकडे प्रत्येकी ४०००/— रुपये दयावे लागतील असे सांगून, पंधरा दिवसा नंतर येण्यास सांगितले.

दिनांक १७/०१/२०२० रोजी मी पुन्हा म्हाडा कार्यालय येथे येवून माझ्या कामकाज संदर्भात मिळकत व्यवस्थापक श्रीमती कवीता राठोड व सहाय्यक श्री. नरेश गावडे याची भेट घेतली. सदर वेळी मिळकत व्यवस्थापक श्रीमती कवीता राठोड व सहाय्यक श्री. नरेश गावडे यांनी मला प्रथम ७५००/— रुपये लिगल चार्ज भरुन पैसे भरल्याची पावती घेवून येण्यास सांगितले. त्यानंतर मी मित्रकक्ष येथे जावून ऑनलाईन पध्दतीने ७५००/— रुपये भरणा केल्याची पावती घेवून पुन्हा मिळकत व्यवस्थापक श्रीमती कवीता राठोड व सहाय्यक श्री. नरेश गावडे यांना भेटलो. त्यावेळी त्यांनी मला रितसर पैसे भरले परंतू आम्ही सांगितलेली रक्कम दिल्याशिवाय नावामध्ये फेरफार

Scanned with CamScanner

(नियमीतीकरण) कसे होईल अशी विचारणा केली. त्यानंतर मी त्यांना विनंती करुन सुध्दा त्यांनी प्रत्येकी ४०००/— रूपये दिल्याशिवाय काम होणार नाही असे सांगितले. परंतू मला त्यांना लाच म्हणून पैसे दयावयाची इच्छा नसल्याने, मी त्यांना सध्या पैसे नसल्याचे सांगून घरी निघून गेलो. मिळकत व्यवस्थापक श्रीमती कवीता राठोड व सहाय्यक श्री. नरेश गावडे यांना मला लाच दयावयाची इच्छा नसल्याने, मी दिनांक २०/०१/२०२० रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वरळी मुंबई येथे म्हाडाचे मिळकत व्यवस्थापक श्रीमती कविता राठोड व सहाय्यक श्री नरेश गावडे यांचेविरोधात मराठीत स्वाक्षरात लेखी तक्रार दिली. सदरवेळी सहाय्यक पोलीस आयुक्त श्री नवनाथ जगताप व सहाय्यक पोलीस आयुक्त श्री शिवाजी माने साहेब यांनी माझ्या तक्रारीची दखल घेवून मला म्हाडाचे मिळकत व्यवस्थापक श्रीमती कविता राठोड व सहाय्यक श्री नरेश गावडे यांनी दिनांक २२/०१/२०२० रोजी लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितले असल्याने, दिनांक २२/०१/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे येण्यास सांगितले.

सपोआ श्री जगताप साहेब यांनी सांगितल्याप्रमाणे मी दिनांक २२/०१/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे त्यांच्या कक्षात जावून त्यांची भेट घेतली. मिळकत व्यवस्थापक श्रीमती कविता राठोड व सहाय्यक श्री नरेश गावडे हे दुपारनंतर भेटणार असल्याची माहिती मी सपोआ जगताप यांना दिली. मी दिलेल्या माहिती प्रमाणे सपोआ श्री जगताप साहेब यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागातील गोपनीय कक्षात स्वत:चे, माझे व पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले.

त्यानंतर सहाय्यक पोलीस आयुक्त श्री नवनाथ जगताप यांनी मला मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यात येणार असून, पडताळणी दरम्यान माझे शर्टाचे आतील बाजूस बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून, माझे व लोकसेवक यांच्यात होणारे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे ध्वनिमुद्रित करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच पडताळणीमध्ये लोकसेवक मिळकत व्यवस्थापक श्रीमती राठोड व त्याचे सहाय्यक श्री नरेश गावडे यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यास त्या अनुषंगाने पुढील सापळा कारवाई करण्यात येईल असे सांगितले.

मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता मी आज रोजी सपोआ श्री नवनाथ जगताप, सपोआ श्री शिवाजी माने, कारवाई पथक व पंचासह लाप्रवि. कार्यालयातून पोलीस वाहनाने निघून सरपोचखानवाला रोड, वरळी सी लिंक रोड, पश्चिम द्रुतगती मार्ग, कलानगर म्हाडा कार्यालय, बांद्रा मुंबई येथे आलो. सपोआ श्री जगताप यांनी योग्य त्या सुचना देवून माझे शर्टाचे आतील बनियनला व्हाईस रेकॉर्डर लावून, चालू करुन लोकसेवकांची भेट घेण्याकामी पंच क्रमांक १ श्री यादव यांच्यासोबत पाठविले. त्यावेळी साधारण १५.३८ वाजले होते.

सपोआ जगताप साहेब यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी व पंच क्रमांक १ श्री यादव असे लोकसेवक मिळकत व्यवस्थापक श्रीमती राठोड व त्याचे सहाय्यक श्री नरेश गावडे यांना त्यांचे म्हाडा कार्यालयातील ५ व्या मजल्यावर असलेल्या मिळकत व्यवस्थापक कुर्ला/चेम्बूर या कार्यालयात येवून भेट घेतली. मी मिळकत व्यवस्थापक श्रीमती राठोड व त्याचे सहाय्यक श्री नरेश गावडे यांना माझ्या कामासंदर्भात विचारणा केली तेव्हा मिळकत व्यवस्थापक श्रीमती राठोड यांनी माझ्याकडे ५०००/— रुपयाची व

Scanned with CamScanner

FORM-1A

त्याचे सहाय्यक श्री नरेश गावडे यांनी ४०००/– रुपयाची असे दोघांनी मिळून एकुण ९०००/– रुपयाची लाच मागितली. सदरवेळी मी त्यांना पैसे घेवून येतो असे सांगून त्यांचे कार्यालयातून निघालो व कारवाई पथक जेथे थांबले होते तेथे पोहचलो. सदर ठिकाणी सपोआ जगताप यांनी माझ्या शर्टाच्या आतील बाजूस बनियानला लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर स्वतःच्या ताब्यात घेतला.

सपोआ जगताप व शिवाजी माने यांनी मला लोकसेवकांसोबतच्या भेटीदरम्यान झालेल्या संभाषणाबाबत विचारले मी त्यांना लोकसेवकांनी ५०००/– रुपये व ४०००/– रुपये असे एकुण ९०००/– रुपयाची लाच मागितली असल्याचे सांगितले. त्यानंतर सपोआ जगताप व शिवाजी माने यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मध्ये ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण ऐकून मिळकत व्यवस्थापक श्रीमती कविता राठोड व त्याचे सहाय्यक श्री नरेश गावडे यांनी पैशाच्या स्वरूपात लाचेची मागणी केल्याची खात्री केली. सपोआ जगताप यांच्या सुचनेप्रमाणे मी माझ्याकडील घरखर्चाच्या बचती मधील ९०००/– रूपये सादर केले. सपोआ जगताप यांच्या सुचनेप्रमाणे पोलीस अंमलदार चालक शिवथरे यांनी पंचासमक्ष लाचेच्या रक्कमेचे ५०००/– व ४०००/–रुपयाचे असे दोन भाग करुन नोटांना ॲथ्रेसिनची पावडर कापसाच्या बोळयाने लावून, रू. ५०००/– खुले माझ्या शर्टाच्या डाव्या खिशात ठेवले व रू. ४०००/– एका खाकी रंगाच्या लिफाफ्यामध्ये ठेवून लिफाफ्यास ॲथ्रेसिनची पावडर लावून, लिफाफा रक्कमेसह पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवला.

सपोआ श्री जगताप साहेब यांनी मला,पंच व सापळा पथकास सापळा कार्यवाही दरम्यान घ्यावयाची खबरदारीबाबत सुचना देवून, लोकसेवक कविता राठोड, नरेश गावडे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यास डोक्यावरून उजवा हात फिरवून सापळा पथकास इशारा देण्याबाबत मला सूचना दिल्या. सदर सुचना दिल्यानंतर सपोआ श्री जगताप यांनी माझ्या शर्टच्या आतील बाजूस बनियानला व्हाईस रेकॉर्डर लावून, सुरु करुन पंच क्रमांक १ श्री. यादव यांचेसोबत लोकसेवक मिळकत व्यवस्थापक श्रीमती कविता राठोड, व त्याचे सहाय्यक श्री नरेश गावडे यांना भेटण्यासाठी पाठविले.

मी म्हाडा कार्यालयातील ५ व्या मजल्यावर असलेल्या मिळकत व्यवस्थापक कुर्ला/चेम्बूर येथे आलो असता मिळकत व्यवस्थापक श्रीमती कविता राठोड यांचे सहाय्यक श्री नरेश गावडे यांचेशी माझी फ्लॅट नियमितीकरण आदेशाची प्रत देण्याबाबत पुन्हा चर्चा झाली. त्यावेळी श्री नरेश गावडे यांनी मला नियमितीकरण आदेशाची प्रत मिळकत व्यवस्थापक श्रीमती कविता राठोड यांच्या कडे स्वाक्षरी करीता देण्यात आलेली आहे असे सांगून त्यांना भेटण्यास सांगितले. त्यानंतर मी मिळकत व्यवस्थापक श्रीमती कविता राठोड याच्या कक्षात जावून त्याची भेट घेवून, फ्लॅट नियमितीकरण आदेशाच्या प्रत संदर्भात विचारणा केली. त्यावेळी श्रीमती राठोड यांनी तुमचे काम केले असुन, त्यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कम त्यांचे टेबलच्या ड्राव्हरमध्ये ठेवण्यास सांगून टेबलचा ड्राव्हर उघडून रक्कम त्याच्यात ठेवण्यास इशारा केला. त्यावेळी मी माझ्या शर्टाच्या डाव्या खिशातील ५०००/– रूपयाची रक्कम श्रीमती राठोड यांचे कामकाजाच्या टेबलाच्या ड्राव्हर मध्ये ठेवली. त्यानंतर मी पून्हा श्रीमती राठोड यांचे सहाय्यक श्री गावडे यांच्या जवळ गेलो. त्यावेळी श्री गावडे यांनी माझ्याकडे पैशाची मागणी करून, ती त्याच्या टेबलावर ठेवण्यास सांगितली त्याप्रमाणे मी माझ्या पॅन्टीच्या

Scanned with CamScanner

उजव्या खिशातुन खाकी रंगाच्या लिफाफ्यात ठेवलेले रू. ४०००/— रक्कम त्यांच्या टेबलावर ठेवली. त्यानंतर श्री गावडे यांनी फ्लॅट नियमितीकरण आदेशाच्या प्रतीवर मिळकत व्यवस्थापक श्रीमती राठोड यांची स्वाक्षरी घेवून, जावक करून, प्रत मला दिली. मिळकत व्यवस्थापक श्रीमती राठोड व त्याचे साहय्यक श्री गावडे यांनी माझ्याकडून लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर ठरल्याप्रमाणे मी सापळा पथकास लाच स्विकारल्याबाबत इशारा केला. त्यांनतर लागलीच सापळा पथकाने पंचासमक्ष मिळकत व्यवस्थापक श्रीमती कविता राठोड व त्याचे सहाय्यक श्री नरेश गावडे यांना लाचेची रक्कम स्विकारताना सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी रंगेहाथ पकडले.

मी नियमाप्रमाणे ७५००/— रुपये लिगल चार्ज भरुन सुध्दा दिनांक २२/०१/२०२० रोजी लोकसेवक श्रीमती कविता राठोड व श्री नरेश गावडे यांनी फ्लॅट नियमितीकरण आदेशाची प्रत देण्याच्या मोबदल्यात माझ्याकडे ५०००/— व ४०००/— अशी एकूण ९०००/— रुपयाची पैशाच्या स्वरूपात लाचेची मागणी करुन, ती स्विकारताना रंगेहाथ पकडले. म्हणून माझी मिळकत व्यवस्थापक श्रीमती कविता राठोड व त्याचे सहाय्यक श्री नरेश गावडे यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत टंकलिखीत केला असून तो मी वाचून पाहिला असता माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

( नवनाथ जगताप )
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

Scanned with CamScanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ ........
Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

........ — ........

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ — ........
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ — ........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

नमुद तारीख वेळी व ठिकाणी यातील आलोसे यांनी म्हाडाच्या निवासी गाळ्याचे नियमीतीकरण करण्यासाठी लाचेची मागणी करुन, फिर्यादी यांच्याकडून आलोसे क्र.०१ श्रीमती कविता राठोड यांनी रु.५०००/- व आलोसे क्र.०२ श्री नरेश गावडे यांनी रु.४०००/- कायदेशीर परिश्रमाखेरीज परितोषण म्हणून लाचेची रक्कम स्विकारली म्हणून गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
नवनाथ संभु जगताप, सहाय्यक पोलीस आयुक्त, ला. प्र. वि. मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........ — ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ — ........, जिल्हा ........ — ........, राज्य ........ — ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.).................. Rank................ No................ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to.................................................... (3) Transferred to P. S. .................................................... District.................................................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name नवनाथ संभु जगताप
पदनाम Rank सहाय्यक पोलीस आयुक्त
तपासिक अं. चा कोड क्र. ला. प्र. वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ....................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख....................
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner